NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २४.११.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ पोलीसांची कामगिरी :– जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.

दिनांक २४.११.२०२६ चे ०२.०० वा. ते ०२.४५ चे दरम्यान, फिर्यादीचा भाऊ नामे अर्जुन सुनिल लाडसे, वय १७ वर्ष, रा. प्लॉट नं. ८२, लवकुश नगर, महल्ले सभागृहाजवळ, हुडकेश्वर, नागपूर हा आरोपी क्र. १) शैलेष हिरामनजी गुल्हाने, वय ४० वर्षे, प्लॉट नं. १४६, अध्यापक नगर, मानेवाडा रोड हुडकेश्वर नागपूर याचे घराजवळ वाढदिवसाची पार्टीकरीता गेला असता, तेथे इतर आरोपी नामे २) पियुष मेंढे ३) ऋषिकेश जांगजोड ४) पराग चौधरी ५) नागेंद्र उर्फ भावेश राव व त्यांचा एक साथीदार सुध्दा हजर होते. आरोपी क्र. १ ने कोणत्यातरी अज्ञात कारणाने गैरकायद्याची मंडळी जमवून संगणमताने फिर्यादीचा भाऊ अर्जुन लाडसे यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने, त्याचेजवळील अग्निशस्त्राने डोक्यावर गोळी मारून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यास उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे. अशा फिर्यादी करण सुनिल लाडसे, वय १९ वर्ष, रा. प्लॉट नं. ८२, लवकुश नगर, महल्ले सभागृहाजवळ, हुडकेश्वर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१),१९१(३),१९० भा.न्या.सं. सहकलम ३,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ चे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी त्वरीत भेट देवून, आरोपी नामे पियुष मेंढे यास ताब्यात घेवून, गुन्हे संबंधाने विचारपूस केली असता, त्याने बनावटी व खोटी माहिती पोलीसांना दिली. पोलीसांना त्याचेवर संशय बळावल्याने अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने सांगीतले की, आरोपी क्र. १ ने दारूचे नशेत त्याचेकडे पिस्टल असल्याचे बोलून, त्याने एक गोळी हवेत फायर केली व दुसरी गोळी फिर्यादीचा भाऊ अर्जुन लाडसेचे दिशेने फायर केली असता, ती गोळी अर्जुनचे डोक्याला लागून तो गंभीर जखमी झाला. तसेच, आरोपी क्र १ ने त्याचा भाऊ नामे सुनिल गुल्हाने याचे मदतीने त्याचे घराला लावलेले सीसीटीव्हि चे डीव्हिआर काढून ऋषिकेश जांगजोडे चे घरी लपवून ठेवले असुन, घटनास्थळी पडलेले रक्त घरच्यांच्या मदतीने साफसफाई करून, गुन्ह्यात वापरलेले अग्निशस्त्र हे घराचे मागे लपवून ठेवल्याचे कबुल केले.

अशाप्रकारे युनिट क्र ०४ यांनी नमुद जिवे ठार मारण्याचा प्रयत्नाचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणून, आरोपी क्र. १) शैलेष हिरामनजी गुल्हाने, वय ४० वर्षे, प्लॉट नं. १४६, अध्यापक नगर, मानेवाडा रोड, हुडकेश्वर, नागपूर व त्याचे साथीदार आरोपी क्र. २) पियुष बबनराव मेंढे, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ५६ ए, गुरूदेव नगर, म्हाळगी नगर रोड, हुडकेश्वर, नागपूर, ३) ऋषिकेश विलास जांगजोडे, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ६०, लवकुश नगर, माही रेस्टॉरेन्ट मागे, मानेवाडा, हुडकेश्वर, नागपूर, ४) पराग शिवाजी चौधरी, वय २३ वर्षे, रा. पवनपुत्र नगर, सावली अम्मा दर्गाह जवळ, दिघोरी, हुडकेश्वर, नागपूर, ५) नागेंद्र उर्फ भावेश संजय राव, वय २८ वर्षे, प्लॉट नं. ५९, लवकुश नगर, माही रेस्टॉरेन्ट मागे, मानेवाडा, हुडकेश्वर, नागपूर व त्यांचा एक साथीदार

विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले आहे. आरोपी क्र. १ याचेकडून गुन्ह्यात वापरलेले अग्निशस्त्र व सीसीटिव्हि डिव्हिआर हस्तगत करण्यात आले आहे. आरोपी क्र. १ ते ५ आणि विधीसंघर्षग्रस्त बालक यासर्वांना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती संजीवनी थोरात, सपोनि. वैभव बारंगे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, सफौ. नाजीर शेख, पोहवा. अजय यादव, अभिषेक शनिवारे, प्रकाश राजपल्लीवाल, चापोहवा. लक्ष्मण कळमकर, पोअं. महेश काटवले व चपोअं. श्रीकांत मारवाडे यांनी केली

२) हिंगणा पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २४.११.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, हिंगणा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे बेलतरोडी अंतर्गत हद्दपार असलेला आरोपी नामे प्रतिक पटेल हा पोलीस ठाणे हिंगणा हद्ददीत, डोंगरगाव जुन्या टोल नाक्याजवळ फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रतिक उर्फ गोलू राम पटेल, वय २५ वर्षे, रा. श्रमिक नगर, परसोडी झोपडपट्टी, बेलतरोडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. २१००/२०२५ दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने रात्रीचेवेळी वावरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हिंगणा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. प्रमोद घोंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. रवि सावतकर, पोहवा. गजानन भटकर, किशार बेलोकर व पोअं. अनिल झाडे यांनी केली.

३) लकडगंज पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.११.२०२६ चे १२.२० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गंगा जमुना वस्ती, चिंचेच्या झाडाजवळील गल्लीत एक ईसम ज्याने अंगात काळ्या–पांढऱ्या रंगाचा चौकडीचा फुल शर्ट व जिन्स घातलेला असून, तो आपलेजवळ चाकु बाळगून फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून परिसरात पाहणी करीत असता, प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अल्लाउद्दीन उर्फ राकेश वसंता मौदेकर, वय ३६ वर्षे, रा. घासबाजार, चिंतेश्वर मंदीर मागे, लकडगंज, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कमरेत जिन्स पॅन्टचे आंत एक लोखंडी धारदार चाकु किंमती अंदाजे २००/–रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने आपले ताब्यात शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,

२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी वपोनि. श्री मुकुंद कवाडे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. सागर शिंदे, पोअं. सुरज मडावी व देवेंद्र सेलुकर यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे बजाजनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २४.११.२०२६ चे ०८.१० वा. चे सुमारास, फिर्यादीचे सासरे नामे विजय विठ्ठलराव गोहाडे, वय ७५ वर्षे, रा. ७ बी, सुरेंद्र नगर, नागपूर हे त्यांचे दुचाकी क्र. एम.एच १२ जे.आर ८२७७ ने तात्या टोपे गार्डन येथुन त्यांचे राहते घरी परत येत असता, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, आरपीटीएस ते खामला चौकाकडे जाणाऱ्या रोडवरील इंडीयन ऑईल पेट्रोल पंप, तात्या टोपेनगर, द मंदीर स्टोअर्स जवळ एका ग्रे रंगाच्या मारूती सुझुकी ग्रॅन्ड विटारा कार क्र. एम.एच ३१ जी.जी ८८८१ चा चालक नामे विक्रम चॉदरतन लखोटीया, वय २८ वर्षे, रा. फ्लॅट नं. २०९, फ्रेन्ड्स कॉलोनी, रचना नक्षत्र, अश्वीनी अपार्टमेंन्ट, जगदीश नगर, गिट्टीखदान, नागपूर याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे सासऱ्यांचे दुचाकीला धडक देवून, त्यांना गंभीर जखमी केले. कार चालक आरोपीने जखमी फिर्यादीचे सासऱ्यांना उपचाराकरीता ऑरेंज सिटी हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी मिलींद गोपालराव देशमुख, वय ५५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ००२, मेघदिप अपार्टमेन्ट, लुंबिनी नगर, हिंगणा रोड, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे सफौ. दयानंद सहारे यांनी कार चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.११.२०२६ चे २२.३० वा. सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत राहणारे ३५,४३/१, मोठा इंदोरा, भिम चौक, नारा रोड, जरीपटका, नागपूर येथे राहणारे फिर्यादी ईशांत सिध्दार्थ देशभ्रतार, वय ३८ वर्षे हे त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाज्याला कुलूप लावून वरचे मजल्यावरील बेडरूमध्ये व त्यांची आजी हॉल शेजारील बेडरूममध्ये झोपली असता, दिनांक २४.११.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे आजीला जाग आल्याने त्यांना ३० वर्षीय दोन ईसम घरामध्ये चोरी करतांना दिसुन आले. फिर्यादीचे आजीने फिर्यादीस आवाज दिला असता, ते दोन्ही चोरटे ईसम तेथुन पळुन गेले. फिर्यादीने घराची पाहणी केली असता, त्यांना आलमारीत ठेवलेले रोख ७०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे दागिने व मोबाईल फोन असा एकुण किंमती १,७६,०००/—रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही. दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कडी—कोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, आजीचे बेडरूममध्ये ठेवलेला नमुद मुद्देमाल चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. सुनिल गोरडे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही चोरटे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.